CNRNOMHSN090011422025

## <u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २०८/२०२५</u>.
## <u>निशाणी क्रमांक ५ खालील आदेश.</u>

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. परशराम पाटोळे. | **<u>वादी.</u>** |
| | *विरुध्द.* | |
| ०१. | बबूताई शिंदे. | **<u>प्रतिवादी.</u>** |

(०१). प्रस्तुतचा दावा वादीने जाहीर ठरावाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या वकीलांनी युक्तिवादादरमयान असे कथन केले की, प्रतिवादी ही मयत परशराम मारुती पाटोळे यांची कायदेशीर वारस नसताना केवळ चुकीच्या पध्दतीने खोटे मृत्यूदाखले तयार करुन घेवुन प्रतिवादीने मयत परशराम यांच्या मिळकतीवर स्वतःचे नाव लावले आहे. मयत परशराम याच्या मिळकतीशी प्रतिवादीचा काहीही संबंध नसताना केवळ चुकीच्या वारस नोंदीच्या आधारे प्रतिवादी ही मयत परशराम यांच्या मालकीची नगर भूमापन क्र. ५४०/१/ब ही मिळकत विक्री करु पहात आहे अगर त्यामध्ये त्रयस्त इसमाचा हक्क निर्माण करु पहात आहे. यास्तव वादीतर्फे वकीलांनी तात्पुरता स्थगिती मिळावा अशी विनंती केली आहे.

(०२). प्रतिवादीला दिनांक २६.०९.२०२५ रोजी दाव्याचे समन्स व निशाणी क्र. ५ च्या अर्जाची नोटीस मिळूनही प्रतीवादी दाव्यात हजर झाली नाही व म्हणणे दाखल केले नाही. दाव्याचे स्वरुप व वादीची कथने पाहता दाव्यामध्ये वारंवारीता टाळण्याकरीता दाव्यामध्ये तात्पुरता स्थगिती आदेश पारीत करणे न्यायोचित होणार आहे असे माझे मत झाल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश.

**०१.** प्रतिवादीला आदेशीत करण्यात येते की, प्रस्तुत दाव्यातील नगर भूमापन क्र. ५४०/१/ब या मिळकतीची आहे ती परीस्थिती पुढील तारखेपर्यंत कायम ठेवावी.

**०२.** खर्चाबाबत आदेश नाही.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2025.10.14 17:58:01 +0530

**तासगांव.** (एस.वाय.वाकचौरे)
दिनांक : १४.१०.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव.**

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. अभय अरविंद रणदिवे |
| न्यायालय | – | सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली. |
| दिनांक | – | १४.१०.२०२५. |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक | – | १४.१०.२०२५. |
| आदेश अपलोड दिनांक | – | १४.१०.२०२५. |